पुढारी E-PAPER

Sunday, September 04, 2005 1:40:00 AM

# डोमिनो पद्धतीने अवयव प्रत्यारोपण

## दात्यांची अदलाबदली, पाच जणांना जीवदान

**मुंबई : प्रतिनिधी**

अवयव प्रत्यारोपणासाठी अवयवदाते असतात, मात्र दात्याचे व रुग्णाचे अवयव मॅच न झाल्याने अनेकांना वर्षानुवर्षे वाट बघावी लागते. या प्रतीक्षेत काहींचा मृत्यू ओढवतो. त्यावर मात करण्यासाठी आता डोमिनो अवयव प्रत्यारोपण पध्दतीने, म्हणजेच अवयवांचे साटेलोटे करून अवयव प्रत्यारोपण करण्याचे तंत्र विकसित झाले आहे. याच पध्दतीने मंगळवारी मुंबईत किडनी प्रत्यारोपणाच्या पाच शस्त्रक्रिया करण्यात आलेल्या आहेत.

मुंबईमध्ये तीन हजाराहून अधिक रुग्ण किडनीच्या प्रतीक्षेत आहेत. मात्र त्यांना किडनी मिळत नसल्याने वर्षानुवर्षे डायलेसिसवर आहेत. झालेल्या शस्त्रक्रियांत राजस्थानातील एक कुटुंब व महाराष्ट्रातील चार कुटुंबांचा समावेश आहे. राजस्थानातील पित्याने आपल्या मुलीला तर महाराष्ट्रातील पत्नी संशुनिशा हिने पती आरिफला, पत्नी स्मिता हिने पती राजेशला, पती काशीनाथने पत्नी सुषमाला आणि पत्नी सुरेखाने पती उमेशला किडनी दान केली होती. त्यांच्या किडनी एकमेकांना मॅच न झाल्याने या पध्दतीने या पाचही रुग्णांवर मुंबईमध्ये किडनी प्रत्यारोपणाच्या शस्त्रक्रिया करण्यात आल्या. त्यातील दोन शस्त्रक्रिया बॉम्बे हॉस्पिटल, दोन हिरानंदानी हॉस्पिटल व एक हिंदुजा हॉस्पिटलमध्ये झाली.

अॅपेक्स स्वॅप ट्रान्सप्लान्ट रजिस्ट्री या संस्थेकडून किडनी प्रत्यारोपणासाठी विनामूल्य नोंदणी केली जाते. गेल्या १८ महिन्यांमध्ये ९५ रुग्णांची नोंद झाली असून त्यातील ३० रुग्णांचे स्वॅप पध्दतीने प्रत्यारोपण करण्यात आले आहे. संस्थेतील डॉक्टरांकडून किडनी मॅच झाल्यानंतर संबंधितांना कळविण्यात येते. पहिला डोमिनो ट्रान्सप्लान्ट अयशस्वी झाले होते. मात्र दुसरे यशस्वी झाल्याचे बॉम्बे हॉस्पिटलचे डॉ. श्रीरंग बिछू यांनी सांगितले.




### अशी आहे डोमिनो पद्धत

काही रुग्णांचे नातेवाईक, मित्र अवयवदानासाठी पुढे येतात. मात्र दाता व रुग्णाचा रक्तगट न जुळणे, काही वैद्यकीय चाचण्यांनुसार अवयव देता न येणे, अशा समस्या असतात. एका रुग्णाच्या दात्याचे अवयव दुसऱ्या रुग्णाच्या दात्याच्या अवयवाशी मॅच होऊ शकत असतील, तर दोन्ही रुग्णांच्या नातेवाईकांचे समुपदेशन करून एकमेकांना अवयवदान करण्यासाठी प्रवृत्त केले जाते. यालाच डोमिनो पध्दतीने अवयव प्रत्यारोपण म्हणतात. या शस्त्रक्रियाही याच पद्धतीने करण्यात आल्या आहेत.